महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ २२ /२०२४ दि. २८/०२/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना:–

*******

**ज्याअर्थी,** ठाणे वाहतूक विभागाच्या कार्यक्षेत्रातील कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीमध्ये दिनांक २५/०२/२०२३ रोजी **'श्री श्रीनिवास कल्याणम् महोत्सव'** कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने डोंबिवली हद्दीतून सागर्ली गांव, बालाजी मंदिर येथून शोभा यात्रा/मिरवणूक निघणार असून दरम्यान प्रिमियर कंपनी ग्राउंड कल्याण शिळ रोड, मानपाडा, डोंबिवली पूर्व येथे पोहोचणार आहे. सदर कार्यक्रमाकरिता मोठया प्रमाणात जनसमुदाय उपस्थित राहणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, गणेश गावडे, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा ठाणे शहर, अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) मुंब्रा, कल्याण फाटा कडून कल्याण कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना **कल्याण फाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने कल्याण फाटा–मुंब्रा बायपास–खारेगाव टोलनाका कडून नाशिक मुंबई महामार्गाने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) दुर्गाडी चौक कडून पत्रीपूल मेट्रो मॉल कल्याण पूर्व कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना **दुर्गाडी चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने दुर्गाडी चौक कडून **खडकपाडा** मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) वालधूनी चौक कडून आनंद दिघे उड्डाणपूल मार्गे कल्याण पूर्व कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना **वालधुनी चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने उल्हासनगर व सुभाष चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) श्रीराम चौक (विठ्ठलवाडी वाहतूक उप विभाग ) कडून जूना पुना लिंक रोड व कोळसेवाडी पोलीस ठाणे कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना **श्रीराम चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने श्रीराम चौक कडून उल्हासनगर, शहाड व अंबरनाथ मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) नेवाळी नाका (विठ्ठलवाडी वाहतूक उप विभाग) कडून कोळसेवाडी वाहतूक उप विभाग हद्दीत जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना **नेवाळी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने बदलापूर अंबरनाथ मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ६) तळोजा बायपास मार्गे खोणी निसर्ग ढाबा कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना **खोणी निसर्ग ढाबा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने बदलापूर अंबरनाथ व काटई–बदलापूर चौक–लोढा पलावा–कल्याण फाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. २५/०२/२०२४ रोजी सकाळी ०५:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो अंमलात राहील.
सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( गणेश गावडे )
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर,
अतिरिक्त कार्यभार
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CamScanner

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य, मुंबई.

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे, भिवंडी, कल्याण–डोंबिवली, उल्हासनगर, नवी मुंबई महानगरपालिका.

मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.

मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे/कल्याण

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण,

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर.

ठाणे पोलीस पत्रक.

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर.

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– संबंधित सहायक पोलीस आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर/संबंधित पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

२/– म.न.पा. कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner